ePaper

“बाबरी मशीद पाडतानाची दृश्ये पाहून मी रडले होते”; सोनिया गांधी



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 08 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



'गोकुळ'वर ताब्याची भावना चुकीची; फडणवीसांनी स्पष्ट केली भूमिका

'गोकुळ'वर सरकारचा अंकुश?

महाईन्यूज । मुंबई

कोल्हापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी मानल्या जाणाऱ्या प्रसिद्ध ‘गोकुळ’ दूध संघावर प्रशासकीय संचालक मंडळाची नेमणूक का करण्यात आली, यावर उठलेल्या राजकीय वादंगावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मौन सोडलं आहे. अलिकडेच पार पडलेल्या ‘गोकुळ’च्या निवडणुकीत सत्ताधारी महायुतीचा पराभव झाला होता. गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत महायुतीला पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर राज्य शासनाने गोकुळ दूध संघावर एक शासननियुक्त आणि चार स्वीकृत संचालक नेमून त्यापैकी चौघांना मतदानाचा अधिकार दिला आहे. या नंतर महायुती सरकारने गोकुळसह इतर मोठ्या सहकारी संस्थांवरील आपले वर्चस्व आणि नियंत्रण प्रस्थापित करण्यासाठीच हा नवा अध्यादेश जारी केल्याची टीका होत आहे.



काय आहे अध्यादेश?

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० याच्या कलम ७३ अ- मध्ये पोट कलम -२ मधील पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येत आहे. पाचशे कोटी रुपयांपेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या आणि भाग भांडवल, कर्ज, हमी, अनुदान, शासकीय जमीन या स्वरूपात शासनाकडून प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहाय्य मिळत असल्यास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांखेरीज, संघीय संस्थांच्या बाबतीत समितीमध्ये शासनाद्वारे नामनिर्देशित केलेल्या पुढील पाच सदस्यांचा समावेश असेल.

“गोकुळवर ताबा मिळवण्याचा किंवा या संस्थेत ढवळाढवळ करण्याचा राज्य सरकारचा कोणताही हेतू नाही,” असं स्पष्ट करत मुख्यमंत्र्यांनी या निर्णयामागील तांत्रिक आणि वैधानिक कारणं विस्तृतपणे मांडली आहेत.

गोकुळच्या निवडणुकीनंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या गोकुळमध्ये दोन वेगवेगळे गट आहेत. मात्र, अध्यक्षांची निवड करण्यासाठी आवश्यक असणारा ‘कोरम’ एकाही गटाकडे पूर्ण नाही. एखाद्या गटाने बैठकीवर बहिष्कार टाकला तर अध्यक्षांची निवडणूक होणे अशक्य होते. न्यायालयाने यापूर्वी निश्चित केलेल्या तारखेला एका गटाची अनुपस्थिती राहिल्याने निवडणूक होऊ शकली नव्हती. कोर्टाने १० तारखेला पुन्हा निवडणूक घेण्याचे निर्देश दिले असले, तरी कोरमशिवाय निवडणूक होऊ शकत नाही, हा नियम कायम राहतो.

गोकुळच्या उपविधींचा आणि सहकार कायद्याचा संदर्भ देत फडणवीस पुढे म्हणाले, “तीन वेळा अशा प्रकारे कोरमअभावी निवडणूक रद्द झाल्यास सर्व कायदेशीर अधिकार जिल्हा उपनिबंधकांकडे जातात. अशा वेळी लोकप्रतिनिधींना कोणतेही अधिकार उरत नाहीत. ही तांत्रिक कोंडी फुटून कोरम पूर्ण व्हावा आणि निवड प्रक्रिया सुरळीत व्हावी, याच एका उद्देशाने मताधिकार असणाऱ्या संचालकांची नामनिर्देशित पद्धतीने नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.”

कोण असेल सदस्य?

सहकारी संस्थांच्या सहायक निबंधकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला एक शासकीय अधिकारी त्यामध्ये असेल. त्याचबरोबर संस्थेच्या कामकाजाशी संबंधित आवश्यक अनुभव असलेल्या आणि अशी अर्हता धारण करणाऱ्या चार व्यक्ती त्यामध्ये असतील. कामकाज सुरळीत चालण्यासाठी चार व्यक्ती मतदानाच्या हक्कासह समितीच्या सदस्य असतील. तसेच मतदानाच्या हक्काशिवाय एका शासकीय अधिकाऱ्याला शासनाद्वारे नामनिर्देशित करणे शासनास इष्ट वाटते, असे अध्यादेशात म्हटले आहे.

राज्य सरकारवर होणाऱ्या हस्तक्षेपाच्या आरोपांना फेटाळताना मुख्यमंत्र्यांनी स्थानिक नेत्यांना एकत्र येण्याचं आवाहन केलं. “हसन मुश्रीफ, विनय कोरे आणि बंटी पाटील या सर्व प्रमुख नेत्यांनी एकत्र बसून यावर एकमताने तोडगा काढावा. जर दोन्ही गटांनी सहमतीने निर्णय घेतला, तर सरकारला कोणालाही पाठवण्यात रस नाही. गोकुळ ही जिल्ह्याची एक महत्त्वाची संस्था असली तरी तिच्या कारभारात हस्तक्षेप करून सरकारला काहीही साध्य करायचे नाही,” असं त्यांनी स्पष्ट केलं.

गोकुळच्या निकालाचा राज्याच्या राजकारणावर कोणताही परिणाम होत नाही, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी राजकीय आरोपांतील हवा काढून घेतली. “गोकुळच्या निवडणुकीनंतर झालेल्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघ निवडणुकीत भाजपाचा विजय झालात्यामुळे या संपूर्ण विषयाला राजकीय रंग देणे चुकीचे आहे. स्थानिक नेत्यांनी वैधानिक पेच दूर करून संस्था सुरळीत चालवावी, एवढीच सरकारची अपेक्षा आहे,” असे फडणवीस यांनी शेवटी नमूद केले.

कोल्हापूर जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील अतिशय महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ‘गोकुळ’ दूध संघाच्या निवडणुकीवरून सध्या राजकीय वातावरण तापले आहे. मात्र, या समीकरणांवर बोलताना फडणवीस यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. “गोकुळ ही निश्चितच एक चांगली संस्था आहे. पण ती इतकीही मोठी नाही की, ती आमच्यासोबत आली नाही तर आमचे खूप मोठे नुकसान होईल. त्यामुळे आम्हाला या निवडणुकीत कोणताही राजकीय रस नाही,” असा टोलाही त्यांनी लगावला आहे.

दिवाळीच्या आनंदावर निकृष्ट तांदळाचे विरजण!

रेशनच्या धान्यात किडी, लालसर दाणे आणि अळी-वाळवी; जिल्हाधिकाऱ्यांचे राज्य सरकारला पत्र

महाईन्यूज । पुणे

दिवाळीच्या सणात रेशनकार्डधारकांना निकृष्ट दर्जाच्या तांदळाचे वाटप होत असल्याने ग्राहकांमध्ये नाराजी पसरली आहे. शहरातील अनेक रास्त धान्य दुकानांमध्ये तांदळाचा अपुरा पुरवठा होत असतानाच उपलब्ध तांदळात किडी, लालसर दाणे, अळी-वाळवी आणि तुकडा तांदूळ आढळत आहे. त्यामुळे अनेक ग्राहकांनी तांदूळ घेण्यास नकार दिला असून, दुकानदारांनाही ग्राहकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. वारंवार तक्रारी करूनही पुरवठा विभागाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याची तक्रार रेशन दुकानदार संघटनेने केली आहे.



शहरातील अनेक रेशन दुकानांमध्ये दिवाळी सुरू होऊनही तांदूळ उपलब्ध झालेला नाही. भंडारा येथून तांदळाचा पुरवठा होत असल्याने वितरणास विलंब होत असल्याची माहिती अन्नधान्य वितरण अधिकारी प्रशांत खताळ यांनी दिली. मात्र, अपुऱ्या पुरवठ्यासोबतच तांदळाच्या गुणवत्तेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. तांदूळ खाण्यायोग्य नसल्याच्या तक्रारी ग्राहक करत आहेत. त्यामुळे ग्राहक आणि दुकानदारांमध्ये वादाचे प्रसंग घडत आहेत.

रेशन दुकानदार संघटनेचे अध्यक्ष गणेश डांगी यांनीही तांदळाच्या निकृष्ट दर्जाबाबत नाराजी व्यक्त केली. त्यांच्या दुकानात आलेल्या तांदळाची गुणवत्ता खराब असल्याने अनेक ग्राहक तो स्वीकारण्यास नकार देत आहेत. याबाबत पुरवठा विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे पूर्वीप्रमाणे भारतीय अन्न महामंडळाकडून तांदळाचा पुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील रास्त धान्य दुकानांसाठी भंडारा जिल्ह्यातून पाठविण्यात आलेल्या सीएमआर तांदळाबाबतही गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. जुन्नर, खेड आणि मावळ तालुक्यांतील दुकानांमध्ये वितरित झालेल्या तांदळात सोंडे, लालसर दाणे आणि तुकडा तांदूळ आढळल्याचे तहसीलदारांनी जिल्हा प्रशासनाला कळविले आहे. शिरूर येथील सरकारी धान्य गोदामातील तपासणीत काही गोण्यांमध्ये अळी-वाळवी लागलेला आणि निकृष्ट तांदूळ आढळला. बारामतीमध्येही तांदळाचा रंग लालसर असून, त्याला वेगळा वास येत असल्याची तक्रार करण्यात आली. त्यामुळे संबंधित साठा परत पाठविण्यात आला.

या तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी राज्य सरकारला पत्र पाठविले आहे. नोव्हेंबरमधील उर्वरित आणि डिसेंबर २०२६ मधील संपूर्ण सीएमआर तांदळाचे नियतन रद्द करून भारतीय अन्न महामंडळाकडून तांदूळ उचलण्यास परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. ग्रामीण भागाप्रमाणे पुणे शहरासाठीही असा प्रस्ताव पाठवावा, अशी मागणी रेशन दुकानदार संघटनेने केली आहे.

ताटात निकृष्ट धान्य

रेशनच्या तांदळाच्या गुणवत्तेबाबत सातत्याने तक्रारी होत असतानाही पुरवठा विभागाकडून ठोस पावले उचलली जात नसल्याचे चित्र आहे. अपुरा पुरवठा आणि निकृष्ट धान्यामुळे ग्राहकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे तांदळाची गुणवत्ता तपासून चांगल्या प्रतीचे धान्य उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

> “रेशन दुकानांमधून देण्यात येणारा तांदूळ निकृष्ट आहे. ग्राहक वैतागले आहेत. अन्य जिल्ह्यांप्रमाणे हा तांदूळ अन्न महामंडळाकडून घ्यावा अशी मागणी अन्नधान्य वितरण अधिकाऱ्यांकडे केली आहे.”
> - गणेश डांगी, अध्यक्ष, रेशन दुकानदार संघटना, पुणे शहर

सिंहगडाच्या वैभवाला नवा साज; संवर्धनासाठी ९ कोटींचा आराखडा!

महाईन्यूज । पुणे

छत्रपती शिवरायांच्या शौर्याचा साक्षीदार असलेल्या सिंहगड किल्ल्याच्या संवर्धनासाठी पुरातत्त्व विभागाने सुमारे ९ कोटी रुपयांचा आराखडा तयार केला आहे. किल्ल्याचे ऐतिहासिक महत्त्व जपत पर्यटन सुविधांचा विकास करण्यावर या आराखड्यात भर देण्यात आला आहे. पुणे दरवाज्याच्या तिन्ही प्रवेशद्वारांची दुरुस्ती, तटबंदीचे मजबुतीकरण, दगडी पायवाट, देवटाक्याचे संवर्धन आणि संग्रहालयाची उभारणी अशी विविध कामे प्रस्तावित आहेत. जिल्हा नियोजन समितीने २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी निधी राखीव ठेवला असून, निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.



सिंहगडावर पर्यटकांची मोठी वर्दळ असते. मात्र, अनेक ठिकाणी तटबंदीची पडझड, खराब झालेल्या पायऱ्या आणि दगडी बांधकामाची झीज झाली आहे. या पार्श्वभूमीवर पार्किंगपासून नरवीर तानाजी मालुसरे यांच्या समाधीपर्यंत सुमारे ७५० मीटर लांबीचा दगडी पदपथ तयार करण्यात येणार आहे. पुणे दरवाजा क्रमांक १, २ आणि ३ यांची दुरुस्ती तसेच प्रवेशद्वारांजवळील दगडी पायऱ्या आणि कठड्यांची कामे केली जाणार आहेत.

किल्ल्याची सुमारे ३१५ रनिंग मीटर लांबीची तुटलेली संरक्षित तटबंदी दुरुस्त करून तिचे मजबुतीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय बुरुजांची दुरुस्ती, फरसबंदी, भिंतींची स्वच्छता आणि ग्राउटिंग अशी कामेही प्रस्तावित आहेत. दुरुस्ती करताना किल्ल्याच्या मूळ ऐतिहासिक बांधकामाला धक्का लागणार नाही, याची काळजी घेतली जाणार आहे.

छत्रपती राजाराम महाराजांच्या समाधीमागील जुन्या वाड्याचे संग्रहालय आणि प्रदर्शन क्षेत्रात रूपांतर करण्याचा प्रस्ताव आहे. येथे सिंहगडाचा इतिहास उलगडणारे माहिती फलक तसेच एआर-व्हीआरसारख्या डिजिटल माध्यमांचा वापर केला जाणार आहे. संग्रहालयाला जोडून लहान उपहारगृह उभारण्याची संकल्पनाही मांडण्यात आली आहे.

किल्ल्यावरील ऐतिहासिक देवटाक्याच्या भिंती आणि छताची दुरुस्ती करून वास्तूचे संवर्धन केले जाणार आहे. तसेच युनेस्कोच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार माहिती व दिशादर्शक फलक लावण्यात येणार आहेत.

मूळचा कोंढाणा म्हणून ओळखला जाणारा सिंहगड १६७० मधील ऐतिहासिक लढाई आणि नरवीर तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमामुळे प्रसिद्ध आहे. किल्ल्याचे क्षेत्रफळ ८५ एकर असून, घेरा सिंहगडचा विस्तार ७ हजार ७६० एकर आहे. प्रस्तावित कामांमुळे या ऐतिहासिक वारशाचे जतन होण्यास मदत होणार आहे.

सिंहगडाचे नवे वैभव

सिंहगडाच्या संवर्धनासाठी ९ कोटींचा आराखडा तयार करण्यात आला असून, यामध्ये ऐतिहासिक दरवाजे, तटबंदी, पायवाटा आणि देवटाक्याची दुरुस्ती करण्यात येणार आहे. तसेच जुन्या वाड्याचे संग्रहालयात रूपांतर करून पर्यटकांना सिंहगडाचा इतिहास डिजिटल माध्यमातून अनुभवता येणार आहे.

> “पुणे जिल्ह्याची ओळख म्हणून सिंहगडाकडे पाहिले जाते. त्याचे संवर्धन करणे गरजेचे असून त्याची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.”
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी

कचऱ्यात दोन पाय अन् अख्ख्या परिसरात दहशत

पिंपळे गुरवमध्ये खळबळजनक प्रकार! मानवी अवयवांची विल्हेवाट कोणी लावली?

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपळे गुरव परिसरात रस्त्यालगतच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात पुरुषाचे गुडघ्यापासून कापलेले दोन पाय आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. शुक्रवारी (दि. ६ नोव्हेंबर) सकाळी अकराच्या सुमारास ही धक्कादायक घटना उघडकीस आली. भरवस्तीत मानवी अवयव आढळल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सांगवी पोलीस आणि गुन्हे शाखेने तपास सुरू केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कर्मचारी शुक्रवारी सकाळी काटेपुरम चौक ते रामकृष्ण मंगल कार्यालय रस्त्यावरील श्रीनगर लेन क्रमांक तीन परिसरात नियमित कचरा संकलन करीत होते. यावेळी रस्त्याच्या कडेला पडलेला कचरा उचलताना एका कर्मचाऱ्याला गुडघ्यापासून कापलेल्या अवस्थेतील दोन मानवी पाय आढळून आले. या प्रकाराची माहिती तत्काळ पोलिसांना देण्यात आली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सांगवी पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि गुन्हे शाखेची पथके घटनास्थळी दाखल झाली. प्राथमिक अंदाजानुसार, हे मानवी अवयव शुक्रवारी पहाटेच्या सुमारास या ठिकाणी टाकण्यात आले असावेत, अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मात्र, संबंधित व्यक्तीची ओळख आणि अवयव या ठिकाणी कोणी टाकले, याबाबत अद्याप स्पष्टता झालेली नाही.

पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू असून, बेपत्ता व्यक्तींच्या नोंदीही पडताळल्या जात आहेत. तसेच तांत्रिक पुराव्यांच्या आधारे या घटनेचा उलगडा करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सर्व शक्यता विचारात घेऊन तपास करण्यात येत असल्याचे सांगवी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल नांदेकर यांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणात गुन्हा दाखल करण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा सुरू होती. शुक्रवार रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झाला नसल्याची माहिती समोर आली होती. या घटनेमागील नेमके कारण आणि संबंधित व्यक्तीची ओळख पटविण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

सीसीटीव्ही फुटेजवर पोलिसांची नजर

मानवी अवयव कचऱ्यात कोणी आणि कधी टाकले, याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यावर भर दिला आहे. बेपत्ता व्यक्तींच्या नोंदी आणि तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू असून, या घटनेमागे घातपात आहे की अन्य काही कारण, हे तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

बेवारस वाहनांनी गिळला रस्ता; काळेवाडीत वाहतुकीचा बोजवारा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

काळेवाडीतील तापकीर मळा परिसरात रस्त्याच्या कडेला अनेक दिवसांपासून उभ्या असलेल्या बेवारस वाहनांनी नागरिकांची डोकेदुखी वाढवली आहे. आधीच वर्दळीच्या असलेल्या रस्त्यांवर या वाहनांनी जागा व्यापल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. दुचाकीस्वार, पादचारी आणि ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत असून, अपघात घडण्यापूर्वीच प्रशासनाने या वाहनांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

अपघाताची वाट न पाहता कारवाई करा!

काळेवाडीतील तापकीर मळा रस्त्यावर अनेक दिवसांपासून धूळखात उभ्या असलेल्या बेवारस वाहनांमुळे रस्ता अरुंद झाला आहे. वाहनचालकांसह पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून ये-जा करावी लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अपघाताचा धोका वाढला आहे. वाहतूक पोलिसांनी तातडीने पाहणी करून वाहनमालकांना नोटिसा बजावाव्यात आणि बेवारस वाहने हटवावीत. एखादा गंभीर अपघात झाल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



काळेवाडीतील तापकीर मळा परिसरात निवासी इमारतींसह व्यावसायिक आस्थापनांची मोठी संख्या आहे. त्यामुळे या मार्गावर दिवसभर दुचाकी, चारचाकी वाहनांसह पादचाऱ्यांची सतत वर्दळ असते. मात्र, रस्त्याच्या कडेला अनेक दिवसांपासून धूळखात पडलेल्या वाहनांमुळे रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. काही वाहने वापरात नसल्याचे दिसून येत असून, त्यांच्या देखभालीकडेही दुर्लक्ष होत आहे.

या बेवारस वाहनांमुळे समोरून येणाऱ्या वाहनांना वाट देताना दुचाकीस्वारांना मोठी कसरत करावी लागते. विशेषतः रात्रीच्या वेळी अंधारात उभी असलेली वाहने लक्षात न आल्यास गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनाही या मार्गावरून चालताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> आमची बेवारस वाहनांवर नियमित कारवाई सुरू असून अंतर्गत रस्त्यांची पाहणी करून अशा वाहन मालकांना नोटिसा देण्यात येतील. नागरिकांनी बेवारस वाहनांबद्दल कळवावे.
> - चंद्रकांत वाबळे, पोलिस निरीक्षक, सांगवी वाहतूक विभाग

रस्त्यावरील बेवारस वाहनांची माहिती घेऊन संबंधित मालकांना नोटिसा बजावाव्यात. त्यानंतरही वाहने न हटविल्यास ती ताब्यात घेऊन नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. वाहतूक विभागाने केवळ मुख्य रस्त्यांपुरती कारवाई मर्यादित न ठेवता अंतर्गत रस्त्यांकडेही लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, सांगवी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत वाबळे यांनी बेवारस वाहनांवर नियमित कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले. अंतर्गत रस्त्यांची पाहणी करून संबंधित वाहनमालकांना नोटिसा बजावण्यात येतील. नागरिकांनीही अशा वाहनांची माहिती वाहतूक विभागाला द्यावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

भूमिका

महाराष्ट्राच्या राजकारणात नवे सत्तासमीकरण?



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाच्या चर्चांनी पुन्हा एकदा जोर धरला आहे. विशेष म्हणजे, अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीच अजितदादांची दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावीत, अशी इच्छा असल्याची कबुली दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना नवे वळण मिळाले आहे.

अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षातील अंतर्गत अस्वस्थता, नेतृत्वावरून निर्माण झालेले प्रश्न,शरद पवार यांच्या प्रकृतीतील चढउतार आणि दोन्ही गटांतील नेत्यांच्या वाढत्या भेटीगाठी पाहता विलीनीकरणाची शक्यता पुन्हा बळावली आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणातून महाराष्ट्राच्या राजकारणात नवे सत्तासमीकरण आकाराला येणार का, हा प्रश्न महत्त्वाचा ठरत आहे. शरद पवार यांनी १९९९ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडत राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना केली. मात्र, बदलत्या राजकीय परिस्थितीत काँग्रेस आणि राष्ट्रवादीला सत्तेसाठी एकत्र यावे लागले. पुढे २०१४ नंतर भाजपच्या राजकीय विस्तारामुळे राज्यातील प्रस्थापित पक्षांच्या राजकारणात मोठे बदल झाले. शिवसेनेत फूट पडून दोन गट निर्माण झाले, तर राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही अजित पवार आणि शरद पवार असे दोन गट तयार झाले. २०२४ च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजितदादांनी महायुतीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. लोकसभेत अपेक्षित यश मिळाले नसले, तरी विधानसभा निवडणुकीत त्यांच्या नेतृत्वाखाली ४१ आमदार निवडून आले. मात्र, अजितदादांच्या निधनानंतर पक्षातील नेतृत्व आणि निर्णयप्रक्रियेचे प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पक्षाची धुरा सांभाळली असली, तरी प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत पार्थ पवार यांचा प्रभाव वाढल्याची चर्चा आहे. दुसरीकडे, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांसारख्या ज्येष्ठ नेत्यांना अपेक्षित महत्त्व मिळत नसल्याने पक्षांतर्गत नाराजी असल्याचे बोलले जाते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याशी काही नेत्यांनी साधलेला संवाद आणि सुनेत्रा पवार यांनी बोलावलेल्या बैठकीला काही आमदारांची अनुपस्थिती या घडामोडी पक्षातील अंतर्गत मतभेदांकडे लक्ष वेधतात. त्यामुळे पक्षाची एकजूट टिकवणे हे सुनेत्रा पवार यांच्यासमोरील मोठे आव्हान ठरले आहे.

या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी होणाऱ्या भेटी आणि राजकीय संवादालाही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शरद पवार यांच्याशी साधलेला संवाद आणि सुप्रिया सुळे यांच्या राजकीय भूमिकेबाबत केलेले विधान यामुळेही विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. भाजपच्या दृष्टीने दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण राजकीयदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते. कारण, एकत्रित राष्ट्रवादी महायुतीत राहिल्यास राज्यातील सत्तासमीकरण अधिक मजबूत होण्याची शक्यता आहे. उलट, दोन्ही गटांतील मतभेदांमुळे राष्ट्रवादी पुन्हा काँग्रेसच्या जवळ गेल्यास विरोधकांची ताकद वाढू शकते. त्यामुळे राष्ट्रवादीचे एकत्रीकरण कोणत्या राजकीय आघाडीसोबत होते, याला विशेष महत्त्व आहे. दरम्यान, विलीनीकरणाच्या चर्चांबाबत सुनील तटकरे यांनी घेतलेली भूमिका लक्षवेधी ठरली आहे. यापूर्वी विलीनीकरणाचा कोणताही प्रस्ताव चर्चेत नसल्याचे सांगणाऱ्या नेत्यांकडून आता अजितदादांची एकत्रीकरणाची इच्छा असल्याचे मान्य केले जात आहे.

प्रासंगिक »

तत्त्वांची किंमत

एका गावात माधव नावाचा कुंभार राहत होता. त्याची मातीची भांडी दूरवर प्रसिद्ध होती. एकदा गावातील व्यापाऱ्याने त्याला मोठी ऑर्डर दिली. मात्र, त्यासाठी कमी दर्जाची माती वापरण्याचा सल्ला दिला.

त्यामुळे खर्च कमी होऊन जास्त नफा मिळणार होता. माधवसमोर मोठा प्रश्न उभा राहिला.ऑर्डर नाकारली तर आर्थिक नुकसान होणार होते आणि स्वीकारली तर भांड्यांचा दर्जा घसरणार होता. त्याने व्यापाऱ्याला स्पष्ट सांगितले, "मी कमी किमतीत भांडी देऊ शकतो; पण त्यांच्या गुणवत्तेशी तडजोड करणार नाही."

व्यापारी रागावून निघून गेला. काही दिवसांनी त्याने दुसऱ्या कुंभाराकडून भांडी बनवून घेतली. मात्र, ती लवकरच फुटू लागली. ग्राहकांनी तक्रारी केल्यानंतर त्याचे मोठे नुकसान झाले.

ही बातमी समजल्यानंतर व्यापारी पुन्हा माधवकडे आला आणि त्याला मोठी ऑर्डर दिली. माधवने ती आनंदाने स्वीकारली.

- तात्पर्य : तात्पुरत्या फायद्यापेक्षा आपल्या तत्त्वांशी प्रामाणिक राहणे अधिक महत्त्वाचे असते.

जगप्रसिद्ध फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या मते, यशस्वी होण्याच्या प्रवासातील सर्वांत कठीण गोष्ट म्हणजे सातत्य. एखादी गोष्ट रोज करण्याची इच्छा नसतानाही ती शिस्तीने करत राहणे, हीच खरी परीक्षा असते.

सातत्य, समर्पण आणि मेहनत... यशाचं खरं गमक!

रोनाल्डो सांगतो की, गेल्या पंधरा वर्षांतील त्याच्या कामगिरीमागे सातत्यपूर्ण प्रयत्न, संपूर्ण समर्पण आणि कठोर मेहनत आहे. केवळ गुणवत्ता असून चालत नाही, तर स्वतःला शंभर टक्के झोकून देण्याची तयारी असावी लागते. आजही जेवणानंतर तो किमान ३० ते ४० मिनिटे व्यायामासाठी देतो. याच शिस्तीमुळे वय वाढले तरी त्याची तंदुरुस्ती आणि मैदानावरील कामगिरी टिकून आहे. विक्रमांच्या मागे धावण्यापेक्षा मेहनत करत राहिल्यास विक्रम आपोआप आपल्या मागे येतात, असा त्याचा विश्वास आहे.

यशाच्या प्रवासात अपयशही तितकेच महत्त्वाचे असते. पडल्यावर पुन्हा उभे राहण्याची क्षमता प्रत्येकाकडे असली पाहिजे. रोनाल्डोच्या मते, माणूस यशाच्या शिखरावर असताना जितके शिकत नाही, त्यापेक्षा अधिक शिकण्याची संधी त्याला कठीण काळात मिळते. आव्हाने माणसाला स्वतःमध्ये सुधारणा करण्याची प्रेरणा देतात.

मेस्सीशी होणाऱ्या तुलनेबाबतही रोनाल्डो सकारात्मक आहे. स्वतःला सर्वोत्तम मानण्याचा आत्मविश्वास प्रत्येक



खेळाडूमध्ये असावा, असे तो सांगतो. मात्र, फुटबॉल हा खेळ आहे, युद्ध नाही. मैदानावर प्रतिस्पर्ध्यांपेक्षा स्वतःच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. तरुण खेळाडू अधिक वेगवान आणि ताकदवान होत असताना स्वतःची तयारीही त्याच दर्जाची ठेवावी लागते. केवळ शारीरिक क्षमता नव्हे, तर योग्य मानसिकता आणि संघसहकाऱ्यांना मदत करण्याची वृत्तीही तितकीच महत्त्वाची आहे.

पराभवाने निराशा येते, रागही येतो; मात्र त्यातून लवकर सावरणे गरजेचे असते. फ्रान्सविरुद्ध पेनल्टी शूटआऊटमध्ये पराभूत झाल्यानंतर रोनाल्डोला सावरण्यासाठी दोन दिवस लागले. मात्र, तिसऱ्या दिवशी तो पुन्हा जिम, सराव आणि मेहनतीकडे वळला. त्याच्या संपूर्ण प्रवासातून एकच संदेश मिळतो, तो म्हणजे प्रतिभा तुम्हाला सुरुवात करून देते; पण सातत्य, शिस्त आणि मेहनतच तुम्हाला सर्वोच्च शिखरावर पोहोचवते!

रोनाल्डोच्या यशामागे आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्वतःवर असलेला प्रचंड विश्वास. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे त्याला महत्त्वाचे वाटते. मैदानावर प्रत्येक क्षणी सर्वोत्तम देण्याची तयारी त्याने कायम ठेवली आहे. वय, अनुभव किंवा आधी मिळवलेले यश यापैकी कोणतीही गोष्ट त्याला थांबवू शकत नाही. उलट, प्रत्येक नवे आव्हान स्वतःला सिद्ध करण्याची संधी म्हणून तो स्वीकारतो. यश मिळाल्यानंतरही थांबून न राहता नव्या ध्येयासाठी स्वतःला तयार ठेवणे, ही रोनाल्डोची खासियत आहे. प्रसिद्धी आणि विक्रम यांपेक्षा स्वतःच्या कामगिरीत सातत्याने सुधारणा करण्यावर त्याचा अधिक भर असतो. प्रत्येक सराव, प्रत्येक सामना आणि प्रत्येक अनुभवातून काहीतरी नवे शिकण्याचा त्याचा प्रयत्न असतो.

।। अभंगवाणी ।।



देती घेती परज गेली ।
घर खालीं करूनियां ॥१॥

धांवणियाचे न पडे हातीं ।
खादली राती काळोखी ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

राज्यातील ७२ बालगृहांना शासनाचा दणका!

मान्यता नूतनीकरणासाठी अर्जच केला नाही; पुण्यासह १८ जिल्ह्यांत कारवाई

महाईन्यूज । नागपूर

राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या ७२ बालगृहांची मान्यता राज्य सरकारने रद्द केली आहे. मान्यतेची मुदत संपल्यानंतर संबंधित संस्थांनी नूतनीकरणासाठी अर्ज केला नसल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत पुणे, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, नाशिक, नागपूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूरसह १८ जिल्ह्यांतील बालगृहांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, नागपुरातील मान्यता रद्द झालेली तीनही बालगृहे गेल्या दोन वर्षांपासून बंद होती.

बालगृह चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना शासनाची मान्यता घेणे बंधनकारक असते. ही मान्यता साधारणपणे पाच वर्षांसाठी दिली जाते. मुदत संपल्यानंतर संस्थांनी नूतनीकरणासाठी अर्ज करणे आवश्यक असते. मात्र, संबंधित ७२ संस्थांकडून अर्ज प्राप्त न झाल्याने शासनाने त्यांच्या मान्यता रद्द करण्याचा आदेश जारी केला.

नागपूर शहरात सध्या सात बालगृहे आणि चार शिशुगृहे अशी एकूण ११ बालसंगोपन केंद्रे सुरू आहेत. यापैकी चार बालगृहे सरकारी व्यवस्थापनाखाली, तर तीन खासगी संस्थांकडून चालविली जातात. चारही शिशुगृहांची जबाबदारी खासगी संस्थांकडे आहे. याशिवाय अल्पवयीन मुलांसाठी निरीक्षणगृहही कार्यरत आहे.

सहा ते १८ वयोगटातील कौटुंबिक संरक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना बालगृहांमध्ये आश्रय दिला जातो. त्यांच्या निवास, अन्न, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेची जबाबदारी संस्थांकडून पार पाडली जाते. तर जन्मापासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकांसाठी शिशुगृहांची व्यवस्था असते. या मुलांचे संगोपन, आरोग्य आणि संरक्षण यावर भर दिला जातो. इच्छुक दांपत्यांना कायदेशीर प्रक्रियेद्वारे बालक दत्तक घेण्याचीही सुविधा आहे.

बालसंगोपनाची जबाबदारी

सहा ते १८ वयोगटातील कौटुंबिक संरक्षणापासून वंचित असलेल्या मुलांना बालगृहांमध्ये आश्रय दिला जातो. त्यांच्या निवास, अन्न, शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेची जबाबदारी संस्थांकडून पार पाडली जाते. मुलांना केवळ निवारा देण्याऐवजी शिक्षण आणि कौशल्यांच्या माध्यमातून स्वावलंबी बनविण्यावर भर दिला जातो. वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी तयार केले जाते.



बालगृहांच्या मान्यतेवर गंडांतर

राज्यातील १८ जिल्ह्यांमधील ७२ बालगृहांची मान्यता शासनाने रद्द केली आहे. या संस्थांनी मान्यतेची पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर नूतनीकरणासाठी अर्ज केला नव्हता. त्यामुळे महिला व बालविकास विभागाने ही कारवाई केली. नागपुरातील तीन बालगृहे तर सुमारे दोन वर्षांपूर्वीच बंद झाली होती. बालगृहांमध्ये सहा ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची काळजी घेतली जाते, तर सहा वर्षांखालील बालकांसाठी शिशुगृहे कार्यरत असतात. त्यामुळे मान्यता रद्द झालेल्या संस्थांमधील मुलांच्या पुनर्वसनाचा आणि त्यांच्या संगोपनाचा प्रश्न महत्त्वाचा ठरणार आहे.

शिशुगृहांचा बालकांना आधार

जन्मापासून सहा वर्षांपर्यंतच्या बालकांच्या संगोपनासाठी शिशुगृहे कार्यरत असतात. जन्मानंतर सोडून दिलेली किंवा पालकांना सांभाळणे शक्य नसलेली मुले येथे ठेवली जातात. त्यांच्या आरोग्याची, पोषणाची आणि सुरक्षिततेची काळजी घेतली जाते. इच्छुक दांपत्य किंवा व्यक्तीला कायदेशीर प्रक्रियेद्वारे मूल दत्तक घेता येते. दत्तक प्रक्रिया न झाल्यास संबंधित बालकांच्या संगोपनाची आणि संरक्षणाची जबाबदारी संस्थांकडून पार पाडली जाते.

झाडे तोडणे योग्य नाही; पण हायड्रो प्रकल्पही परत जाणार नाही!

महाईन्यूज । नागपूर

रायगड जिल्ह्यातील कर्जत-भीमाशंकर परिसरात टोरंट पॉवर कंपनीकडून प्रस्तावित ३ हजार मेगावॅट क्षमतेच्या पंप स्टोरेज जलविद्युत प्रकल्पासाठी होणाऱ्या वृक्षतोडीला अभिनेते आणि पर्यावर णवादी कार्यकर्ते सयाजी शिंदे यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली.

नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना बावनकुळे म्हणाले, हायड्रो प्रकल्प राज्यासाठी वरदान ठरतात. अशा प्रकल्पांमुळे स्वस्त वीज उपलब्ध होते. तसेच शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्याच्या दृष्टीनेही हे प्रकल्प महत्त्वाचे आहेत. सयाजी शिंदे यांचे म्हणणे सरकार ऐकून घेईल. वृक्षतोडीची भरपाई करण्यासाठी आवश्यक तेवढी झाडे लावण्याकरिता जमीन उपलब्ध करून देण्याचीही सरकारची तयारी आहे.

झाडे तोडणे योग्य नाही; मात्र हायड्रो प्रकल्पही परत जाणे योग्य ठरणार नाही. पर्यावरणाचा समतोल राखून विकासाचे प्रकल्प पूर्ण करणे आवश्यक आहे, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.





शेतकऱ्यांसाठी नवे निर्णय

शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविणे सुलभ व्हावे, यासाठी महसूल विभागाने फार्मर आयडीसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसत असल्याचा पुरावा असणाऱ्या शेतकऱ्यांनाही आता फार्मर आयडी मिळू शकणार आहे. राज्यातील सुमारे १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना याचा फायदा होईल. दुसरीकडे, ऑनलाइन पीक पाहणीतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी ऑफलाइन नोंदणीचा पर्याय दिला जाणार आहे. तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष तालुकास्तरावर उपलब्ध होणार असल्याने गरजू रुग्णांना आर्थिक मदत मिळविणे अधिक सोयीचे होणार आहे.

पीक पाहणीला ऑफलाइन पर्याय

राज्यात ऑनलाइन पीक पाहणी करताना अनेक शेतकऱ्यांना मोबाईलमधील तांत्रिक समस्या आणि नेटवर्कअभावी अडचणी येत होत्या. त्यामुळे एक लाखाहून अधिक शेतकऱ्यांची पीक पाहणी रखडली होती. ही बाब लक्षात घेऊन सरकारने ऑफलाइन पद्धतीने पीक पाहणी करण्याचा निर्णय घेतला आहे. या पर्यायामुळे ऑनलाइन नोंदणी करू न शकलेल्या शेतकऱ्यांना पीक नोंदणीची संधी मिळणार असून, शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याचा मार्गही सुलभ होणार आहे.

शेतकऱ्यांना योजनांचा लाभ

राज्यातील अनेक शेतकरी वर्षानुवर्षे जमीन कसत असले तरी मालकी हक्काचे पट्टे नसल्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत होत्या. ही अडचण दूर करण्यासाठी १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसत असल्याचा पुरावा असलेल्या शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सुमारे १ लाख ६० हजार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. तसेच ऑनलाइन पीक पाहणी रखडलेल्या शेतकऱ्यांसाठी ऑफलाइन पर्याय उपलब्ध होणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष तालुकास्तरावर सुरू झाल्याने गरजू रुग्णांना आर्थिक मदतीसाठी जिल्हास्तरावर जाण्याची गरज भासणार नाही.

मोदींकडून शिकण्यासारखं काहीही नाही

'बिलाँगिंग - अ जर्नी ऑफ लव्ह' च्या प्रकाशनापूर्वी दिलेल्या मुलाखतीत सोनिया गांधींची टीका

महाईन्यूज । नवी दिल्ली

"गेल्या १२ वर्षांत देशातील सामाजिक ऐक्य, लोकशाही आणि स्वायत्त संस्थांचं प्रचंड नुकसान झालं आहे. हे सरकार गेल्यानंतरही देशातील व्यवस्था पूर्ववत आणण्यासाठी बराच वेळ लागेल," असं मत सोनिया गांधी यांनी मांडलं आहे. त्यांच्या 'बिलाँगिंग – अ जर्नी ऑफ लव्ह' या बहुप्रतिक्षित आत्मचरित्रात्मक पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वी 'द हिंदू'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत त्या बोलत होत्या. १० नोव्हेंबर रोजी हे पुस्तक वाचकांच्या भेटीला येत आहे.



काँग्रेसच्या सद्यस्थितीबद्दल विचारले असता, सोनिया गांधी यांनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. "मी अजिबात निराशावादी नाही. हे सरकार सत्तेवर आल्यापासून काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांना समान संधी मिळालेलीच नाही, हा विचार करणे गरजेचे आहे." त्या पुढे म्हणाल्या, "निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त संस्थांवर सरकारची पूर्ण पकड आहे. मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांवर ताबा, अथांग पैसा आणि धर्माचा राजकीय वापर... या सर्व आव्हानांनंतरही आमचा पक्ष संघर्ष करतोय आणि पुढे जातोय. याला तोंड देण्याची ताकद फक्त काँग्रेसमध्येच आहे."

संविधानात दिलेल्या मूल्यांसाठी काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता आजही गावागावात लढत आहे. अलिकडच्या काही महिन्यांत अनेक निवडणुकांमध्ये कशा प्रकारे फेरफार करण्यात आला, हे स्पष्ट झाले असून जनता आता याविषयी अधिक जागरूक झाली आहे, असा दावा सोनिया गांधी यांनी केला. समान विचारसरणीच्या पक्षांसोबत काँग्रेस एकत्र काम करत असून पक्षाची स्थिती दिवसेंदिवस मजबूत होत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

संघ किंवा मोदींकडून शिकण्यासारखे काहीही नाही

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय प्रवासातून काँग्रेसने काही धडे घ्यावेत का? या प्रश्नावर त्या म्हणाल्या, "ते एका पूर्णपणे वेगळ्या विचारसरणीतून आले आहेत हे खरे आहे. पण काँग्रेसमध्ये राहूनही राजकारणात यशस्वी होण्याचे अनेक मार्ग आहेत—डॉ. मनमोहन सिंग आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे ही त्याची उत्तम उदाहरणे आहेत. मला वाटत नाही की आम्हाला आरएसएस कडून काही शिकण्याची गरज आहे."

२००४ मध्ये पंतप्रधानपद स्वीकारले असते तर धोरणे वेगळी असती का, असा प्रश्न विचारला असता त्या म्हणाल्या, "नाही, असा विचार माझ्या मनात कधीच आला नाही. आमचा यूपीए काळातील अनुभव अतिशय सकारात्मक होता. आम्ही एक टीम म्हणून काम केले. डॉ. मनमोहन सिंग यांनी सरकार चालवले आणि मी पक्षाची धुरा सांभाळली, आमच्या जबाबदाऱ्या स्पष्ट होत्या." 'हार्पर कॉलिन्स इंडिया'तर्फे प्रकाशित होणारे ५४४ पानांचे हे आत्मचरित्र सोनिया गांधी यांचा वैयक्तिक प्रवास सांगणारे आहे, ज्याच्या पार्श्वभूमीत राजकीय घडामोडींचा पट मांडण्यात आला आहे. गेल्या महिन्यात सोनिया गांधी म्हणाल्या होत्या, "इतरांनी अनेक दशके माझी कहाणी सांगितली, आता माझी स्वतःची पाळी आहे. हे आत्मचरित्र बाहेर आल्यावर थोडा गदारोळ तर होणारच!" 'हिंदूस्तान टाइम्स' ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे.

देशातील जनता आता अस्वस्थ

सोनिया गांधी पुढे म्हणाल्या, "मोदी सरकारच्या काळात झालेल्या नुकसानीची जाणीव आता जनतेला होऊ लागली आहे आणि लोकांमधील अस्वस्थता वाढते आहे. परंतु, मी आशावादी आहे. भारतातील जनता सुशासनाच्या पुनरागमनाचं नक्कीच स्वागत करेल, याची मला खात्री आहे." तसेच, काँग्रेस कार्यकर्ते आणि नेत्यांना गेल्या काही वर्षांत अनेक प्रकारच्या छळाचा सामना करावा लागला, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करत व्हाइट हाऊसमध्ये दिवाळी साजरी!

महाईन्यूज । अमेरिका

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिसमध्ये पारंपरिक पद्धतीनं पणती प्रज्वलित करत दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. या खास सोहळ्याला अमेरिकेतील अनेक प्रमुख भारतीय-अमेरिकन नागरिक, उद्योजक आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी एका भारतीय उद्योजकाने अध्यक्ष ट्रम्प यांना 'हनुमान चालीसा' भेट दिल्याने हा सोहळा विशेष चर्चेत आला आहे.



फिटनेस आणि टेक कंपनी 'GOQii' चे संस्थापक आणि भारतीय उद्योजक विशाल गोंडल यांनी या सोहळ्यात सहभाग घेतला. या भेटीदरम्यान त्यांनी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना तुलसीदास रचित 'हनुमान चालीसा'ची प्रत भेट दिली.

या सोहळ्याचे फोटो सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर शेअर करत विशाल गोंडल यांनी लिहिले, "व्हाईट हाऊसच्या ओव्हल ऑफिसमध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा आणि त्यांना हनुमान चालीसा भेट देण्याचा मान मला मिळाला. कोट्यवधी भारतीयांसाठी हनुमान चालीसा हे धैर्य, भक्ती आणि शक्तीचे प्रतीक आहे."


व्हाईट हाऊसमध्ये दिवाळी साजरी करण्याची सुरुवात २००३ मध्ये तत्कालीन अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू. बुश यांच्या काळात झाली होती. त्यानंतर २००९ मध्ये माजी अध्यक्ष बराक ओबामा यांनी व्हाईट हाऊसमध्ये स्वतः पणती लावून ही परंपरा पुढे नेली. तेव्हापासून दरवर्षी व्हाईट हाऊसच्या विविध भागात भारतीय समुदायासोबत दिवाळीचा सण थाटामाटात साजरा केला जातो.

व्हाईट हाऊसमधील या भव्य दीपोत्सवाला अमेरिकेतील विविध क्षेत्रांतील नामवंत भारतीय व्यक्तींनी विशेष उपस्थिती लावली होती. यामध्ये अमेरिकेतील भारताचे राजदूत विनय मोहन क्वात्रा यांचा प्रामुख्याने समावेश होता. एफबीआयचे संचालक कश पटेल यांनीही या सोहळ्याला हजेरी लावली. प्रसिद्ध भारतीय शेफ विकास खन्ना यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आयबीएमचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद कृष्णा हेही या सोहळ्यात सहभागी झाले होते. तसेच अमेरिकेच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थचे संचालक डॉ. जय भट्टाचार्य यांनीही उपस्थिती दर्शवली. विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या या भारतीय व्यक्तिमत्त्वांची उपस्थिती विशेष लक्षवेधी ठरली.



दिशाचा ग्लॅमरस जलवा!

बॉलिवूडच्या दिवाळी पार्ट्यांमध्ये फक्त सेलिब्रिटींची उपस्थितीच चर्चेचा विषय ठरत नाही, तर त्यांच्या हटके फॅशन स्टाइलचीही सोशल मीडियावर जोरदार चर्चा रंगते. कोण साडीमध्ये पारंपरिक सौंदर्य खुलवतंय, तर कोण वेस्टर्न लूकमध्ये ग्लॅमरचा तडका देतंय, याकडे चाहत्यांचं विशेष लक्ष असतं. अशातच अभिनेत्री दिशा पटानी आपल्या हटके फॅशन सेन्समुळे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. आपल्या बोल्ड अंदाजाने चाहत्यांच्या नजरा खिळवून ठेवणाऱ्या दिशाने दिवाळी पार्टीसाठी असा आउटफिट निवडला की, तिच्या लूकची चर्चा होणं साहजिकच आहे. पांढऱ्या रंगाचा स्ट्रक्चर्ड क्रॉप टॉप, त्याला जोडलेल्या पारदर्शक आणि मोत्यांच्या नक्षीने सजवलेल्या बाह्या, असा तिचा एकूण अंदाज लक्षवेधी ठरतो. पारंपरिक सणाच्या वातावरणात मॉडर्न फॅशनचा तडका देत दिशाने पुन्हा एकदा आपला स्टायलिश अंदाज दाखवून दिला आहे.तिच्या या आउटफिटमध्ये मॉडर्न फॅशन आणि पार्टीवेअर स्टाइलचा सुंदर मेळ पाहायला मिळतो. दिशाचा हा अंदाज पाहून चाहत्यांना तिच्या फॅशन सेन्सचं पुन्हा एकदा कौतुक वाटत आहे. विशेष म्हणजे, पारंपरिक कपड्यांपेक्षा वेगळा पर्याय निवडूनही तिने दिवाळी पार्टीसाठी एक हटके फॅशन स्टेटमेंट सादर केलं.



नयनताराचा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फेल?

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री नयनतारा हिचा बहुचर्चित तमिळ फँटसी-कॉमेडी थ्रिलर 'मुकुथी अम्मान २' अखेर ६ नोव्हेंबर २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला आहे. मात्र, तब्बल १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक बजेट असलेल्या या चित्रपटाने पहिल्याच दिवशी बॉक्स ऑफिसवर निराशाजनक कामगिरी केली आहे. 'मुकुथी अम्मान २'ने भारतात पहिल्या दिवशी सुमारे १.८८ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केल्याची माहिती समोर आली आहे. Sacnilk च्या आकडेवारीनुसार, तमिळ आणि तेलुगू या दोन्ही भाषांतील प्रदर्शनातून चित्रपटाने देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर सुमारे २.१५ कोटी रुपयांची कमाई केली. चित्रपटाच्या कमाईत तमिळ व्हर्जनचा सर्वाधिक वाटा आहे. तमिळ भाषेतील १,८८१ शोजमधून चित्रपटाने सुमारे १.७५ कोटी रुपयांची निव्वळ कमाई केली. दुसरीकडे, तेलुगू व्हर्जनला तुलनेने कमी प्रतिसाद मिळाला. 'मुकुथी अम्मान २' चित्रपटाच्या निर्मितीसाठी १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात आला. मात्र, एवढी मोठी गुंतवणूक असूनही पहिल्या दिवसाची कमाई अपेक्षेच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे आगामी दिवसांत चित्रपटाच्या कमाईत वाढ होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'मुकुथी अम्मान २'चे दिग्दर्शन सुंदर सी यांनी केले आहे. हा चित्रपट २०२० मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मुकुथी अम्मान' या चित्रपटाचा सिक्वेल आहे. वेल्स फिल्म इंटरनॅशनल आणि राऊडी पिक्चर्सच्या बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. नयनतारासोबतच रेजिना कॅसांड्रा, दुनिया विजय, उर्वशी, अभिनया आणि योगी बाबू हे कलाकारही महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये आहेत.



अमिताभ बच्चन यांची तब्येत बिघडली

बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्या प्रकृतीबाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली असून, यामुळे त्यांच्या चाहत्यांची चिंता वाढली आहे. आपल्या दमदार आवाजाने, अभिनयाने आणि खास अंदाजाने गेल्या अनेक वर्षांपासून प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे बिग बी सध्या छोट्या पडद्यावरील लोकप्रिय क्विझ शो 'कौन बनेगा करोडपती'च्या (KBC) माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

मात्र, या कार्यक्रमाच्या चित्रीकरणाला अचानक ब्रेक लागल्याची माहिती समोर आली आहे. गेल्या आठवड्यापासून नव्या भागांचे शूटिंग थांबवण्यात आल्याचे वृत्त असून, यामागे अमिताभ बच्चन यांच्या प्रकृतीविषयीची चिंता असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे बिग बींच्या तब्येतीला नेमकं काय झालं, असा प्रश्न चाहत्यांकडून उपस्थित केला जात आहे.

बिग बी सध्या फारसे बरे नसल्यामुळे निर्मात्यांनी नवीन भागांचे चित्रीकरण तात्पुरते थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतरच पुढील शूटिंगचे नियोजन करण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. शूटिंग थांबल्यामुळे प्रेक्षकांची निराशा होऊ नये, यासाठी वाहिनीकडून यापूर्वी चित्रीत करण्यात आलेले सेलिब्रिटी स्पेशल भाग पुन्हा प्रसारित केले जात आहेत.

मोहम्मद शमीचा टेस्ट क्रिकेटला अलविदा!

६४ कसोटी सामन्यांत २२९ विकेट्स घेणाऱ्या मोहम्मद शमीचा मोठा निर्णय

महाईन्यूज । नवी दिल्ली

'कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. पण कसोटी क्रिकेटने ज्या आठवणी दिल्या त्यापासून कधीच दूर जाणार नाही. त्या सदैव माझ्याबरोबर असतील', असं सांगत वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीने क्रिकेटमधल्या पारंपरिक प्रकाराला रामराम केला आहे.



'मी भारताची कसोटी जर्सी पहिल्यांदा परिधान केला तेव्हा एकच स्वप्न होतं- देशवासीयांना अभिमान वाटेल अशी कामगिरी. तेव्हापासून प्रत्येक विकेट, प्रत्येक संघर्ष, प्रत्येक दुखापत, प्रत्येक पुनरागमन यांनी मला खूप काही शिकवलं आहे. कसोटी हा केवळ क्रिकेटचा एक प्रकार नाही, तो माझ्या आयुष्याचा अविभाज्य भागच आहे. अत्यंत कठोर अंत:करणाने कसोटी क्रिकेटला अलविदा करतो आहे. कसोटी क्रिकेटने मला आयुष्यभर स्मरणात राहतील अशा आनंददायी आठवणी दिल्या. या प्रवासात मला साथ देणारे माझे कुटुंबीय, सहकारी खेळाडू, प्रशिक्षक आणि अर्थातच तुम्ही सगळे-चाहते यांचे मनापासून आभार मानतो. तुम्ही बऱ्यावाईट काळात माझ्या पाठीशी ठामपणे उभे राहिलात', असं शमीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या संदेशात म्हटलं आहे.

'बंगाल क्रिकेट असोसिएशन आणि बीसीसीआय यांचा मी ऋणी आहे. त्यांनी माझ्यातील नैपुण्याला व्यासपीठ उपलब्ध करून दिलं. माझ्या क्रिकेट प्रवासात या दोन्ही संघटनांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचं स्थान नेहमीच हृदयाच्या अतिशय जवळ असेल', असं शमीने म्हटलं आहे.

कसोटी क्रिकेटचा संपला असला तरी भारतासाठी खेळत राहणं हे माझ्यासाठी नेहमीच सर्वोच्च ध्येय असेल. कसोटी क्रिकेट, तुझ्याप्रति कृतज्ञ आहे अशा शब्दांत शमीने आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

शमीने ६४ कसोटीत भारताचं प्रतिनिधित्व करताना २२९ विकेट्स पटकावल्या. शमीने डावात ५ विकेट्स पटकावण्याची किमया ६वेळा केली. २०१३ मध्ये ६ नोव्हेंबर रोजीच शमीने वेस्ट इंडिजविरुद्ध भारतासाठी पदार्पण केलं होतं. २०२३ मध्ये शमी भारतासाठी शेवटची कसोटी खेळला होता.

मॉर्ने मॉर्केल ने ब्रॉडकास्टर्ससोबत बोलताना मोहम्मद शमीच्या निवृत्तीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. मॉर्केल म्हणाला, "ज्यावेळी मी या संघात आलो, त्यावेळी मी खूप लकी होतो कारण मोहम्मद शमी या संघाचा भाग होता. तो खूप उत्तम गोलंदाज आहे. तो संघात असला की खूप फरक पडतो. त्याने माझी खूप मदत केली. तो अजूनही गोलंदाजी करतोय, हे पाहून खूप बरं वाटतं."

शमीच्या कसोटी निवृत्तीवर रवी शास्त्री नाराज

भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीच्या कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीवर निराशा व्यक्त केली आहे. शमीमध्ये कसोटी क्रिकेटमध्ये आणखी ३० ते ४० विकेट्स घेण्याची क्षमता होती, असं मत शास्त्री यांनी व्यक्त केलं. निवृत्ती जाहीर करण्यापूर्वी शमीला भारतीय कसोटी संघाकडून आणखी एक संधी मिळायला हवी होती, असंही त्यांना वाटतं. शमीच्या फिटनेसवर वारंवार प्रश्न उपस्थित करण्यावरही शास्त्री यांनी नाराजी व्यक्त केली. बंगालकडून खेळताना त्याने केलेली कामगिरी आणि गोलंदाजीचा घेतलेला भार पाहता तो अजूनही सर्वोच्च स्तरावर खेळण्यास सक्षम होता, असं शास्त्री यांनी म्हटलं.

भारताचा न्यूझीलंडवर DLS नियमानुसार ४ धावांनी थरारक विजय

महाईन्यूज । वेलिंग्टन

भारताने दुसऱ्या वनडे सामन्यात डीएलएस पद्धतीने ४ धावांनी विजय मिळवला आहे. यासह पाच सामन्यांच्या वनडे मालिकेत भारतीय संघ २-०ने आघाडीवर आहे. डकवर्थ लुईस नियमाप्रमाणे २६ षटकांनंतर १३५ च्या लक्ष्यानुसार भारताला सामन्यात पुढे राहण्यासाठी १०९ धावांची गरज होती आणि पावसामुळे सामना थांबल्यानंतर भारताची धावसंख्या ७ बाद ११३ होती. यामुळे भारत ४ धावांनी सामन्यात पुढे असल्याने संघाने सामना जिंकला.





भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील वनडे मालिकेत गोलंदाजांचा दबदबा पाहायला मिळत आहे. पावसामुळे दुसरा वनडे सामना उशिराने सुरू झाल्याने ४७ षटकांचा सामना खेळवण्यात आला. या सामन्यात गोलंदाजांनी खेळपट्टीचा पुरेपूर वापर करत कमालीची गोलंदाजी करत फलंदाजांना धावा करू दिल्या नाहीत. दोन्ही संघांच्या वेगवान गोलंदाजांनी विकेट्सचा पाऊस पाडला.

न्यूझीलंड संघाने दिलेल्या १३५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना रोहित शर्माने पहिल्या षटकात चौकार लगावत खातं उघडलं, तर कर्णधार शुबमन गिल गोल्डन डकवर बाद झाला. यानंतर विराट कोहलीदेखील ७ धावा करत माघारी परतला. झटपट गमावलेल्या दोन विकेट्सनंतर रोहित शर्मा व श्रेयस अय्यर यांनी संघाचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला, पण मोठा फटका खेळताना रोहित शर्मा २३ धावांवर बाद झाला. यानंतर अक्षर पटेलही आल्या पावली परतला. तर श्रेयस अय्यरने राहुलच्या जोडीने ३९ धावा जोडल्या, पण ३० धावा करत श्रेयस बाद झाला. अखेरीस केएल राहुल मैदानावर होता.

दुसऱ्या डावात न्यूझीलंडच्या गोलंदाजांनीही चांगली कामगिरी करत भारताला सहज १३५ धावांचा पल्ला गाठू दिला नाही. यामध्ये काईल जेमिसन व जेकब डफी यांचं मोठं योगदान ठरलं. दोघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स घेतल्या. तर फिशरने एक विकेट घेतली.

भारताने नाणेफेक जिंकत न्यूझीलंड संघाला प्रथम फलंदाजीसाठी पाचारण केलं. यानंतर दुसऱ्याच षटकात आकिब नबीने टीम सेफर्टला बाद करत भारताला महत्त्वाचा ब्रेकथ्रू मिळवून दिला, यानंतर सहाव्या षटकात त्याने विल यंगला माघारी धाडलं. त्यानंतर अंशुल कंबोजने हेन्री निकोल्सला क्लीन बोल्ड केलं. त्यानंतर २०व्या षटकात गुरनूर ब्रारने टॉम लॅथम व ग्लेन फिलिप्सला बाद करत किवी संघाची अवस्था ५ बाद ५३ धावा अशी केली.

५ विकेट्स गमावल्यानंतर डॅरिल मिचेल व मिचेल सटरन यांनी ५९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी रचत संघाला १०० धावांचा पल्ला पार करून दिला. डॅरिल मिचेलने या सामन्यात ५५ धावांची तर कर्णधार मिचेल सँटनरने ३१ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. मिचेलला अक्षर पटेलने तर सँटनरला गुरनूर ब्रारने माघारी धाडलं. ही जोडी माघारी परतल्यानंतर न्यूझीलंडचा संघ ४१ षटकांत १३४ धावा करत सर्वबाद झाला. भारताकडून या सामन्यात गुरनूर ब्रारने ४ विकेट्स तर अक्षर पटेल, आकिब नबी व अंशुल कंबोज यांनी प्रत्येकी २-२ विकेट्स घेतल्या.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। रविवार ।
दि. 08 नोव्हेंबर 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE

Think | Thrive | Transform

SHAPE YOUR FUTURE.
LEAD WITH JUSTICE.

B.A. LL.B. (Hons.)
&
B.B.A. LL.B. (Hons.)

INTEGRATED 5 YEAR PROGRAMS



- Build a Strong Foundation in Law.
- Make an Impact.
- Create Change.

ADMISSION OPEN 2026

School of Legal Studies | Experienced Faculty | Moot Court & Practical Training | Global Exposure & Collaborations | Legal Aid Support

APPROVED BY BAR COUNCIL OF INDIA

+91-8600091180
admission@dypiu.ac.in
www.dypiu.ac.in

Apply Now

जनतेच्या नळाला काट्री, वाहनधुलाईला पाण्याची खैरात

पाण्याची उधळपट्टी करणाऱ्यांवर कारवाई कधी; महापालिकेचा हा कसला कारभार?

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

शहरात पाणीपुरवठ्याचे नियोजन करताना महापालिका प्रशासनाची तारेवरची कसरत सुरू असतानाच दुसरीकडे वाहनधुलाईसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे चित्र आहे. एकीकडे नागरिकांना पाणीकपातीचा सामना करावा लागत असताना दुसरीकडे पाइपद्वारे पाणी सोडून वाहने धुतली जात असल्याने संताप व्यक्त होत आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्याची गरज असताना अशा प्रकारांकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष का होत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



राज्यातील अनेक भागांत पाणीटंचाईचे संकट निर्माण झाले असून, शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत शहरातील उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरात काही ठिकाणी वाहनधुलाईसाठी पाइपद्वारे पाण्याचा बेसुमार वापर होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

महापालिकेकडून पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि पाणीकपातीच्या उपाययोजना केल्या जात असताना पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठीही तितक्याच प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले जात असताना प्रत्यक्षात अपव्यय करणाऱ्यांवर ठोस कारवाई होत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

विशेषतः वाहनधुलाईसाठी पाइपचा वापर केल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाण्याची शक्यता असते. पिण्यायोग्य पाण्याचा अशा कामांसाठी वापर टाळणे आवश्यक असून, वाहनधुलाई केंद्रांवरही पाण्याच्या वापराबाबत नियमांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

दरम्यान, महापालिकेने शहरातील विविध भागांत विशेष तपासणी मोहीम राबवून पाण्याचा अपव्यय करणाऱ्यांना समज द्यावी. वारंवार नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पाणीकपातीचा भार केवळ सर्वसामान्य नागरिकांवर टाकण्याऐवजी अपव्यय रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविण्याची गरज!

भविष्यातील पाणीटंचाईचे संकट लक्षात घेता पाणीबचत ही सामूहिक जबाबदारी बनली आहे. वाहनधुलाईसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर टाळणे, आवश्यक तेथे पुनर्वापर केलेल्या पाण्याचा उपयोग करणे आणि अनावश्यक पाणीवापर थांबविणे गरजेचे आहे. महापालिकेने जनजागृतीसोबतच कठोर अंमलबजावणीवर भर द्यावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

आधी धरणग्रस्तांना न्याय द्या, मगच ठोकळवाडीच्या पाण्याला हात लावा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

धरणासाठी जमिनी दिल्या, घरे गमावली, संसार उद्ध्वस्त झाले; मात्र अनेक वर्षांनंतरही धरणग्रस्तांच्या नशिबी संघर्षच आहे. पुनर्वसन, पिण्याचे पाणी, रस्ते आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न प्रलंबित असताना ठोकळवाडी धरणातील पाणी पिंपरी-चिंचवड शहराकडे वळविण्याच्या हालचाली सुरू झाल्याने आंदर मावळातील ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आधी धरणग्रस्तांना न्याय द्या, त्यानंतरच शहराच्या पाणीपुरवठ्याचा विचार करा, अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी पत्रकार परिषदेत मांडली.



पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन ठोकळवाडी धरणातील पाणी शहरासाठी उपलब्ध करण्याबाबत शासनस्तरावर हालचाली सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. यासंदर्भात पाण्याच्या नियोजनाचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्याचीही माहिती समोर आली आहे. मात्र, धरणाच्या उभारणीसाठी मोठा त्याग केलेल्या स्थानिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून पाणी वळविण्याचा निर्णय घेणे अन्यायकारक ठरेल, असा आक्षेप ग्रामस्थांनी नोंदविला.

सन १९९२ मध्ये टाटा पॉवर कंपनीने जलविद्युत प्रकल्पासाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. या प्रकल्पामुळे सुपीक शेती पाण्याखाली गेली. अनेक कुटुंबांना घरे आणि जमिनी सोडून स्थलांतर करावे लागले. मात्र, एवढा मोठा त्याग करूनही धरणग्रस्तांचे पुनर्वसन आणि नागरी सुविधांचे प्रश्न पूर्णपणे मार्गी लागलेले नाहीत, असा आरोप ग्रामस्थांनी केला.

धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी यापूर्वी आंदोलने करण्यात आली होती. त्यावेळी प्रशासनाकडून प्रश्न सोडविण्याची आश्वासने देण्यात आली. मात्र, प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. धरणासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या कुटुंबांना आजही पिण्याचे पाणी, रस्ते आणि इतर मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

शहराच्या पाण्याच्या गरजेपेक्षा धरणग्रस्तांच्या प्रश्नांना दुय्यम स्थान देणे योग्य नाही. त्यामुळे पाणी वळविण्याचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी पुनर्वसनासह सर्व प्रलंबित मागण्यांवर ठोस तोडगा काढावा, अशी मागणी पत्रकार परिषदेत करण्यात आली.

या पत्रकार परिषदेस जिल्हा परिषदेचे सदस्य अनंता पावशे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेश खांडभोर, नारायण ठाकर, नामदेव शेलार, शोभीनाथ भोईर, मारुती खांडभोर, निवृत्ती ठाकर, काळूराम वाडेकर, बबन ओव्हाळ, बाळासाहेब घाडगे, रामदास आलम, सोपान खांडभोर, बजरंग आलम, लहू वाडेकर, बाबाजी पांडे, लक्ष्मण शिंदे, विक्रम हेमाडे, बळीराम वाडेकर, कैलास खांडेभर, सुभाष प्रधान, सुभाष देशमुख आदी उपस्थित होते.

नागरी सुविधांचा प्रश्न प्रलंबित

सन १९९२ मध्ये टाटा पॉवर कंपनीने जलविद्युत प्रकल्पासाठी परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्या. ठोकळवाडी धरणाची साठवण क्षमता सुमारे १२.८६५ टीएमसी असून, या प्रकल्पामुळे सुपीक शेतजमिनी पाण्याखाली गेल्या. अनेक गावांचे विस्थापन झाले, तर अनेक कुटुंबांना स्थलांतर करावे लागले. मात्र, विस्थापित झालेल्या कुटुंबांच्या पुनर्वसनासह अपेक्षित नागरी सुविधांचा प्रश्न अद्याप पूर्णपणे मार्गी लागलेला नाही.

धरणासाठी त्याग आमचा, न्याय मिळणार कधी?

धरणासाठी जमिनी आणि घरे गमावलेल्या कुटुंबांचे पुनर्वसन व मूलभूत सुविधांचे प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. अशा परिस्थितीत धरणातील पाणी शहराकडे वळविण्यापूर्वी स्थानिकांना न्याय मिळाला पाहिजे. धरणासाठी त्याग करणाऱ्यांनाच पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असेल, तर हा कसला विकास? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

पिंपरी-चिंचवडच्या कचरा कोंडीवर तोडगा कधी?

मोशी डेपोवरील ताण कमी करण्यासाठी महापालिकेचे नियोजन; डीपीआरचे काम सुरू

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

शहरातील कचरा कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने दहा ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्रे उभारण्याचे नियोजन केले आहे. त्यासाठी जागा निश्चित करून सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याचे काम सुरू आहे. मात्र, राष्ट्रीय हरित लवाद (एनजीटी) आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतरच प्रकल्प सुरू करता येणार आहेत. त्यातच स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे केंद्रांच्या उभारणीला विलंब होण्याची शक्यता आहे.



मोशी कचरा डेपोतील वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीच्या दुर्घटनेत ८ जुलै रोजी नऊ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर डेपोत कचरा टाकणे बंद झाल्याने शहरात कचरा कोंडी निर्माण झाली. पर्यायी व्यवस्था नसल्याने सध्या पुन्हा मोशी डेपोतच तात्पुरत्या स्वरूपात कचरा टाकला जात आहे.

मोशी डेपोवरील ताण कमी करण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शहरात दहा कचरा प्रक्रिया केंद्रे सुरू करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार १३ सप्टेंबर रोजी दहा जागांची यादी जाहीर करण्यात आली. मात्र, प्रस्तावित केंद्रांना स्थानिक नागरिक, विविध संघटना आणि नगरसेवकांकडून विरोध होत आहे.

दरम्यान, रावेतमधील सेक्टर क्रमांक २३ येथील एमआयडीसीच्या २५ एकर जागेवर वेस्ट टू एनर्जी प्रकल्प उभारण्याचेही नियोजन आहे. त्यासाठी ९ सप्टेंबर रोजी जागेची मागणी करण्यात आली. मात्र, अद्याप जागा ताब्यात मिळालेली नसून या प्रकल्पालाही स्थानिकांचा विरोध आहे. दुसरीकडे मोशी डेपोची क्षमता संपल्याचा दावा करीत नागरिकांनी गुरुवारी (दि. ५) धरणे आंदोलन करून तेथे कचरा टाकण्यास विरोध दर्शविला.

दहा केंद्रांसाठी जागांचा शोध पूर्ण झाला असून, त्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडे सोपविण्यात आल्याचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सांगितले. प्रत्येक प्रकल्पाचा डीपीआर तयार करण्यात येत असून, आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतरच केंद्रे सुरू करता येतील, असे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांनी स्पष्ट केले.

कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी प्रस्तावित दहा जागा

निगडी-यमुनानगर, दळवीनगर-वाल्हेकरवाडी, तानाजीनगर-चिंचवड, दत्तनगर-मोरवाडी, दिघी गायरान, चोविसावाडी, पुनावळेतील दोन जागा, गवळीमाथा-भोसरी आणि खडकी कॅन्टोन्मेंट हद्दीत ही केंद्रे प्रस्तावित आहेत. मात्र, स्थानिकांचा विरोध आणि परवानग्यांच्या प्रक्रियेमुळे केंद्रे प्रत्यक्षात कधी सुरू होणार, याबाबत अनिश्चितता कायम आहे.

महापालिकेच्या १० हजार कंत्राटी कामगारांची दिवाळी गोड होणार!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील सुमारे दहा हजार कंत्राटी कामगारांना दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. कामगार नेते यशवंतभाऊ भोसले यांनी केलेल्या प्रत्येकी १५ हजार रुपये सानुग्रह अनुदानाच्या मागणीला महापौर रवी लांडगे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. याबाबत आर्थिक तरतूद आणि संभाव्य खर्चाचा आढावा घेण्याचे निर्देश मुख्य लेखापरीक्षकांना देण्यात आले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनुदानाबाबत निर्णय घेण्याचे संकेत महापौरांनी दिले आहेत.



महापौर कार्यालयात शुक्रवारी (दि. ६) सकाळी अकरा वाजता महापौर रवी लांडगे आणि कामगार नेते यशवंत भोसले यांच्यात कंत्राटी कामगारांच्या दिवाळी बोनस, वेतन आणि सानुग्रह अनुदानासंदर्भात बैठक झाली. कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे कंत्राटी कामगारांनाही सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी भोसले यांनी केली. त्यावर महापौरांनी लेखा विभागाचा अभिप्राय तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले.

महापालिकेच्या आरोग्य, सुरक्षा आणि विविध विभागांत सुमारे दहा हजार कंत्राटी कामगार कार्यरत आहेत. शहरातील स्वच्छता, आरोग्य आणि अत्यावश्यक सेवा सुरळीत ठेवण्यात या कामगारांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्या कष्टांची महापालिकेला जाणीव असून, दिवाळीनिमित्त जास्तीत जास्त सानुग्रह अनुदान देता यावे, यासाठी सकारात्मक प्रयत्न केले जातील, असे महापौर लांडगे यांनी सांगितले.

यशवंत भोसले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे काही कंत्राटी कामगारांच्या बोनसचा प्रश्न मार्गी लागला आहे. काही कामगारांच्या मासिक वेतनात वाढ करण्यात आली असून, त्यातून वर्षाला सुमारे १८ ते १९ हजार रुपयांचा लाभ मिळत असल्याचे महापौरांनी स्पष्ट केले. मात्र, सानुग्रह अनुदानाची अंतिम रक्कम आर्थिक हिशेब तपासल्यानंतरच निश्चित करता येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, काही कंत्राटदारांकडून कामगारांच्या वेतनपत्रकात बोनसचा स्वतंत्र उल्लेख केला जातो. मात्र, प्रत्यक्षात प्रत्येक कामगाराला नियमानुसार बोनस मिळतो की नाही, याची खातरजमा होणे आवश्यक असल्याचे भोसले यांनी सांगितले. कंत्राटी कामगार कायम कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने मेहनत करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा विचार करून त्यांना किमान १५ हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी केली.

महापौर रवी लांडगे यांनी कामगारांच्या प्रश्नांबाबत दाखविलेल्या संवेदनशील भूमिकेचे भोसले यांनी स्वागत केले. यापूर्वी कामगारांच्या विविध मागण्यांसाठी मोर्चे आणि आंदोलने करावी लागली. मात्र, महापौरांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने कामगारांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, लेखा विभागाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनुदानाच्या रकमेबाबत निर्णय जाहीर करण्याचे आश्वासन महापौरांनी दिले असून, महापालिकेच्या निर्णयाकडे हजारो कंत्राटी कामगारांचे लक्ष लागले आहे.

१५ हजारांच्या अनुदानासाठी भोसले आग्रही

महापालिकेच्या विविध विभागांत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांना कायम कर्मचाऱ्यांप्रमाणे सानुग्रह अनुदान मिळावे, यासाठी कामगार नेते यशवंत भोसले यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या मागणीची दखल घेत महापौरांनी आर्थिक तरतूद तपासण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे दहा हजार कामगारांना दिवाळीची भेट मिळण्याची आशा निर्माण झाली असली, तरी अनुदानाची अंतिम रक्कम आणि मंजुरीबाबत अधिकृत निर्णयाची प्रतीक्षा आहे.

Express
Media Enterprises

Professional Live set up with live drone available..

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



PUNE

Contact: 9657767000/9370493922/9664188046